**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २१५ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.प्रकाश श्रीराम राऊत,
मु.भुर, पो. शेलुबाजार,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानीक स्तर), विभाग,
वाशिम, जि.वाशिम.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
लघुपाटबंधारे (स्थानीक स्तर), उपविभाग,
मंगरुळपिर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानीक स्तर) उपविभाग, मंगरुळपीर श्री.एस.पी. वानखडे हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दिनांक १५/०२/२०१० रोजी दाखल करुन त्यात अशी तक्रार केली की, कोणतीही माहिती दिली नाही किंवा कोणताही पत्रव्यवहार केला नाही. सदर प्रकरणात अर्जदाराने प्रपत्र 'ब' नुसार जे प्रथम अपिल दाखल केले ते अपिलीय अधिकारी यांचेकडे दाखल न करता माहिती अधिकारी यांचे कडे दाखल केले व त्याबाबत दखल घेण्यात आली नाही. जन माहिती अधिकारी यांचे वतीने उपविभागीय अधिकारी, लघुपाटबंधारे (स्थानीक स्तर) उपविभाग, मंगरुळपीर श्री.एस.पी. वानखडे हे हजर आहेत. त्यांचे म्हणण्यानुसार सदर प्रकरणात अर्जदाराला माहिती पाठविण्यासाठी तयार आहे. अर्जदारास माहिती पुरविण्याबाबत सुचना तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी श्री.एस.एन. कापसे यांनी दिनांक ०५/१२/२००९ रोजी दिल्या होत्या व अर्जदाराला हवी असलेली माहिती श्री.एस.आर. पाठक, शाखा अभियंता यांनी झेरॉक्स प्रतीत उपविभागास सादर केलेली आहे.

तरी, अर्जदाराला आजपासुन १० दिवसांचे आंत अर्जदाराने दिलेल्या पत्त्यावर पंजीबध्द डाकेने माहिती पुरवावी. माहिती मिळाल्यानंतर त्या संबंधी अर्जदाराची काही तक्रार राहील्यास अर्जदाराने प्रथम अपिल दिनांक ०४/०१/२०१० च्या अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे तक्रार केल्यास अर्जदाराचे व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकुण घेवुन अपिलीय अधिकारी यांनी योग्य तो आदेश पारीत करावा. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार ९० दिवसात हया आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल करु शकतात. तसेच जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आलेले प्रपत्र 'ब' प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे वर्ग करण्यात यावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २१६ / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.तौकीर अहेमद खान जाहेद खान,
रा.पो. आसेगांव, ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद वाशिम, जि.वाशिम.

**२.** जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक, कलंदरिया उर्दु हायस्कुल मंगरुळपिर,
ता.मंगरुळपिर, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.तौकीर अहेमद खान जाहेद खान हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, कलंदरिया उर्दु हायस्कुल मंगरुळपिर श्री.डॉ. झेड.के. पटेल हे हजर आहेत.

सदर प्रकरणात व्दितीय अपिल दिनांक २२/०२/२०१० रोजी हया आयोगाकडे दाखल केले व त्यात दिनांक १८/०१/२०१० रोजी सुनावणी होती परंतु या दिवशी प्रथम अपिलीय अधिकारी हे हजर नसल्यामुळे त्याबाबत कुठल्याच प्रकारची सुनावणी झाली नाही असे नमुद आहे. त्यानंतर अर्जदाराला कुठली तारीख सुध्दा देण्यात आली नाही किंवा सुनावणी घेवुन आदेश पारीत करण्यात आला नाही. तरी ही बाब गंभीर आहे. तरी, कलम १९(१) नुसार सुनावणी घेवुन आदेश पारीत करणे अपेक्षित आहे परंतु हयाबाबत असे झ ाल्याचे दिसुन येत नाही.

आज हया आयोगासमोर जन माहिती अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, त्यांचा अहवाल दाखल करण्यात आला परंतु निकाल देण्यात आला नाही. त्यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला दिनांक २४/१२/०९ ला पत्र देण्यात आले व त्यात सहाय्यक शिक्षकांची नियुक्ती विषयी प्रक्रिया सध्या सुरु आहे व ही प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती देता येत नाही असे म्हटले आहे. तसेच सदरचे पत्र हे ३० दिवसानंतरचे आहे. शिक्षणाधिकारी यांनी दिनांक ०६/०१/२०१० रोजी सुनावणीची नोटीस काढलेली आहे. सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी व अर्जदार हे हजर होते. परंतु प्रथम अपिलीय अधिकारी यांचे तर्फे कुठलाही निर्णय दिलेला नाही त्यामुळे अर्जदाराला व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल करावे लागले. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निष्काळजीपणा केल्याचे दिसुन येते. तरी, सदर प्रकरणात अर्जदाराला नुकसान भरपाई म्हणुन २०००/- रु. देण्याचा आदेश देण्यात येते कारण अर्जदाराला आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागला व १ वर्षाचा कालावधी होवुनही सदर प्रकरणात कार्यवाही केली नाही.

तरी, अपिलीय अधिकारी यांनी आदेश मिळाल्यापासुन ४ आठवडयाच्या आंत जन माहिती अधिकारी यांचे कडुन माहिती उपलब्ध करुन अर्जदारास पुरवावी व झालेल्या विलंबाबाबत अभिप्राय नोंदवावा. तसेच शिक्षणाधिकारी यांनी हया प्रकरणात २०००/- रु. नुकसान भरपाई म्हणुन ६ आठवडयाच्या आंत अदा करावे व अदा केल्याची पोच घेण्यात यावी. सदरची नुकसान भरपाई रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने सोसायची की, यास जबाबदार असलेल्या अधिका-याकडुन वसुल करायची याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, वाशिम यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

खालील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

१. अपिलीय अधिकारी यांनी आदेश मिळाल्यापासुन ४ आठवडयाच्या आंत जन माहिती अधिकारी यांचे कडुन माहिती उपलब्ध करुन अर्जदारास पुरवावी व झालेल्या विलंबाबाबत अभिप्राय नोंदवावा.

२. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी हया प्रकरणात अर्जदाराला २०००/- रु. नुकसान भरपाई म्हणुन ६ आठवडयाच्या आंत अदा करावे.

वरील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

प्रत, आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वाशिम

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. २१७ / २०१०**

**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री.कैलास ज्ञानदेव इंगळे,
मु.पो. व्याळा, ता.बाळापुर, जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार, तहसिल कार्यालय, बाळापुर,
ता.बाळापुर, जि.अकोला.

२.जन माहिती अधिकारी तथा
निरीक्षण अधिकारी (पुरवठा विभाग),
तहसिल कार्यालय, बाळापुर,
ता.बाळापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री.कैलास ज्ञानदेव इंगळे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, बाळापुर श्री.आर.डी. पवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा निरीक्षण अधिकारी (पुरवठा विभाग), तहसिल कार्यालय, बाळापुर श्री.आर.टी. ठाकरे हे हजर आहेत.

प्रपत्र 'अ' नुसार अर्जदाराला जी माहिती पुरविली ती अपुर्ण आहे. अर्जदाराने वेगवेगळया प्रकारची माहिती मागितली त्यातील साखरेच्या वाटपाची माहिती पुरविण्यात आली नाही. तहसिलदार यांचे म्हणण्यानुसार साखरेचे वाटप डिलर कडुन केले जाते. साखर ही वेगवेगळया डिलरला पाठविण्यात येते त्यामुळे त्याचे स्टॉकवर संबंधित प्राधिकरणाचे किंवा निरीक्षण अधिकारी यांचे कुठल्याच प्रकारचे नियंत्रण नसते म्हणुन माहिती पुरविण्यात आली नाही. अर्जदाराला जी माहिती पुरविण्यात आली ती अपुर्ण आहे असे अर्जदाराचे म्हणणे आहे. तरी त्याबाबत शहानिशा व मुळ अभिलेखाचे अवलोकन करण्यासाठी तहसिलदार हे ६ डिसेंबर २०१० रोजी सकाळी १२.०० वाजता गोदामपालास वरील बिले व स्टॉकबुक संबंधी माहिती घेवुन उपस्थित राहुन व अर्जदाराला निरीक्षण देवुन जी माहिती अपुर्ण आहे ती उपलब्ध करुन देतील. अर्जदाराने मागितलेली माहिती विनाशुल्क पुरविण्यात यावी. अर्जदाराला मिळालेली माहिती व मागितलेली माहिती यामध्ये काही तफावत असल्यास अर्जदारास तशी तक्रार हया आयोगासमोर करता येईल.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.१८००(१०७) /२०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.त्र्यंबक सितारामजी दिपके,
ताजनगर, दिग्रस, ता.दिग्रस,
जि.यवतमाळ.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ,
यवतमाळ विभाग, यवतमाळ.

**२**. जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, अरुणावती प्रकल्प,
आर्णि रोड, दिग्रस, ता.दिग्रस, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे श्री.त्र्यंबक सितारामजी दिपके हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ लिपीक, श्री.विवेक पांडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, अरुणावती प्रकल्प, दिग्रस श्री.पि.व्हि. गायकवाड हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर दिनांक १६/०१/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल करुन अरुणावती प्रकल्पामुळे शेत स.नं. ६४/१(अ) मधील फळझाडांना बहार धरणाचे पाण्यामुळे येत नसल्यामुळे या फळ झाडांचे मुल्यांकन करण्यास कृषी खात्याला पत्राने कळविल्यानुसार कृषी खात्याने त्यांचे पत्र क्र.३३८ दि.२९/०४/२००९ च्या पत्रानुसार मुल्यांकन करुन आपल्या कार्यालयास पाठविले आहे परंतु अद्यापपावेतो नुकसान भरपाई मिळाली नाही व त्याबद्दल कार्यालयाकडुन कार्यवाही झाली नाही असे कारण व्दितीय अपिलात नमुद आहे.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी श्री.गायकवाड हे हजर होते. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे वरिष्ठ लिपीक, श्री.विवेक पांडे हे हजर आहेत. वरील बार्बीवर अर्जदाराचे म्हणणे ऐकुण घेण्यात आले.

सदर प्रकरणात सुनावणी घेतली असता कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्रमांक ५०२३ दि.१४/०९/२००५ रोजी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ यांना जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्र.१०८४/२००५ दि.१९/०४/२००९ सदर पत्राचे अनुषंगाने असे कळविले की, संदर्भिय पत्र क्रमांक ३ नुसार फळझाडांचे मुल्यांकन करुन या कार्यालयास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी पाठविण्यात यावे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार संबंधित कार्यकारी अभियंता अरुणावती प्रकल्प हे याबाबत काही ठोस कार्यवाही करित नाही तसेच मुल्यांकन करुन पाठविले नाही. सदर प्रकरणात उप कार्यकारी अभियंता, अरुणावती प्रकल्प विभाग, दिग्रस यांनी तालुका कृषि अधिकारी, दिग्रस, जि.यवतमाळ यांना पत्र दिनांक ०९/०४/२००९ च्या अनुषंगाने यात असे नमुद केले की, दिनांक २३/०१/२००२ रोजी पाहणी केली असता सदर शेतामध्ये २४० झाडापैकी ८ झाडे वाळलेली आढळुन आली. तथापी सदर शेत धरणाच्या खालील बाजुस धरणापासुन अंदाजे ११०० मिटर लांब असुन शेताची उंची अरुणावती नदीमध्ये वाहणा-या पाण्याच्या वर ६.५० मिटर असल्याने त्यांनी या कार्यालयास कळविले आहे. या स्थितीमध्ये सदर शेतातील फळझाडांचे नुकसान अरुणावती प्रकल्पाच्या पाण्यामुळे होत नाही. तरी अर्जदाराचा त्यांचे

शेतासंबंधी दोन्ही (डावा व उजवा ) कालव्यामुळे नुकसान होते किंवा नाही तसेच नुकसान झाल्यास त्यासंबंधी नुकसान भरपाई याबाबत हा वाद दिसतो.

तरी, हया बाबत प्रथम अपिलीय अधिकारी यांनी हयाबाबत झालेल्या पत्रव्यवहार, अर्जदाराचे निवेदन हया बाबत स्वतः चे स्तरावर सक्षम अधिकारी किंवा स्वतः चौकशी करुन हया बाबत आदेश मिळाल्यापासुन ६ आठवडयाचे आंत निर्णय पारित करावा व तसा निर्णय अर्जदाराला लेखी स्वरुपात कळविण्यात यावा. त्यानंतरही अर्जदाराचे समाधान न झाल्यास अर्जदार उच्च न्यायालयाकडे दाद मागु शकतात.

तसेच अर्जदाराची तक्रार बेस्टवेअर (संरक्षण) भिंतीच्या कामाबाबत अर्धवट काम झाल्यामुळे अर्जदाराचे म्हणण्यानुसार अर्जदाराचे नुकसान होते. तरी त्याबाबत उत्तरवादी यांचे म्हणण्यानुसार या आधीचे ठेकेदार हे काम सोडुन गेले. तरी, हयाबाबत नविन ठेकेदाराकडुन काम करुन घेण्याचे प्रयत्न करण्यात यावा व त्यासाठी संबंधित अधिका-याकडुन योग्य ती मंजुरी मिळाल्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे पत्र अर्जदारास देण्यात यावे तसेच सावंगा (बु.) ते चिरकुरा हया पाटसरीचे कामाबाबत सद्यस्थिती काय आहे आणि त्याबाबत काय कार्यवाही करण्यात येईल हया बाबत अर्जदारास कळवावे.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १८०१(१०८)/ २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.विठ्ठल दौलतराव काकड,
मु.पो.पुनोती खुर्द,
ता.बार्शीटाकळी, जि.अकोला.

**विरुध्द**

**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कृषी विकास अधिकारी,
जिल्हा परिषद कृषी विभाग, अकोला,
जि.अकोला.

**२.** जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, कृषि विभाग,
जिल्हा परिषद, अकोला,
जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, कृषी विभाग, अकोला श्री.बि.ओ. वाडेकर हे हजर आहेत.

अर्जदाराने हया आयोगासमोर व्दितीय अपिल दिनांक ११/०१/२०१० रोजी दाखल केले व त्यात जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती न दिल्याबाबत तसेच अपिलीय अधिकारी यांनी अपिल निर्णय न दिल्याबाबत झालेल्या उल्लंघनाबाबत शिस्तभंगाची कारवाई करावी असे कारण नमुद आहे.

अर्जदाराने दिनांक २९/०८/२००९ रोजी कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे अर्ज दाखल करुन कार्यालयाचे पत्र क्र.जा.क्र./जि.प./कृषी/पं.पॅकेज १/३९/०९ अकोला तारीख ०५/०८/०९ चे संबंधात दि.१०/०८/०९ चे अर्जानुसार कोणती कार्यवाही केली व झालेल्या नुकसान भरपाईस जबाबदार कोण ही माहिती मागितली. सदर प्रकरणात त्यानंतर दिनांक ०९/११/०९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा जिल्हा कृषी अधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले व त्या प्रकरणात दिनांक १९/११/०९ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये गटविकास अधिकारी, बार्शिटाकळी यांचे प्रतिनिधी म्हणुन विस्तार अधिकारी (कृषी) व जन माहिती अधिकारी हे हजर होते. पंतप्रधान पॅकेज अंतर्गत बियाणे परमिट ग्रामसेवक यांनी वाटप केले. संबंधित ग्रामसेवक हे गटविकास अधिकारी , पंचायत समिती, बार्शिटाकळी अंतर्गत आहे. गटविकास अधिकारी यांचे संबंधी विस्तार अधिकारी यांनी झालेल्या सुनावणीमध्ये दिलेल्या अहवालानुसार लाभार्थी संख्या २७७ आहे व ११३ परमिट दिले आहे व अर्जदाराचे नांव १३३ अक्र. आहे. तसेच अर्जदारास बियाणे दिनांक ०९/०७/०९ रोजी देण्यात आले आहे. सोयाबिनची पेरणी ही १५ जुन ते १५ जुलै हा कालावधी पेरणीस पोषक आहे. याबाबत सुनावणी अहवाल अर्जदारास देण्यात आला आहे. त्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्याने अर्जदाराने व्दितीय अपिल हया आयोगासमोर दाखल केलेले आहे .

आज चे सुनावणी दरम्यान अर्जदाराचे म्हणण्यानुसार सन २००९ मध्ये बियाणे वाटप करण्यात आले त्या संबंधीत ग्रामसेवक पुनोती खुर्द यांनी परमिट न दिल्यामुळे या संबंधी जिल्हाधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी विभाग यांचेकडे तक्रार दाखल केली. सदरच्या तक्रारीची दखल घेण्याकरिता दिनांक ०९/०७/०९ रोजी अर्जदाराला बियाणे मिळाले ही बाब अर्जदाराने मान्य केली. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार

सदरचे बियाणे विलंबाने मिळाल्यामुळे उशिरा पेरणी करावी लागली व उशिरा पेरणी केल्यामुळे उगवण शक्ती ८०% कमी झाली व अर्जदाराला पुन्हा बियाणे घेवुन पेरणी करावी लागली व या कामात अर्जदाराला अनावश्यक खर्च करणे भाग पडले म्हणुन सदर परमिट मिळण्यास अर्जदाराला झालेल्या आर्थिक व मानसिक त्रासाबद्दल अहवाल मागविण्यात आला व तो अहवाल गटविकास अधिकारी यांनी दिनांक ०८/०२/२०१० ला कृषी विकास अधिकारी यांना दिला व त्याची एक प्रत अर्जदाराला हया आयोगासमोर देण्यात आली. तसेच हया आयोगासमोर दाखल केलेल्या उत्तराची प्रत सुध्दा देण्यात आली.

वरील बाबी लक्षात घेता अर्जदाराचे नुकसान झाले किंवा नाही ही बाब पुराव्यानिधी सिध्द करुन देणे आवश्यक असते. तरी कार्यवाहीचा भाग किंवा नुकसान भरपाई झाली किंवा नाही हे या आयोगाच्या कक्षेत बसत नाही. परंतु त्या बाबत अर्जदार वरीष्ठ अधिका-याकडे तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १८०२ (१०९) / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
सौ.वैशाली सचिन रोहाड,
रा.लक्ष्मीनारायण नगर, वार्ड क्र.३,
आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ.

**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, यवतमाळ, जि.यवतमाळ.
**२.**जन माहिती अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
आर्णी, ता.आर्णी, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी सौ.वैशाली सचिन रोहाड हया हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे अधिक्षक, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ श्री.एन.पी. कोडगिरवार हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, पंचायत समिती, आर्णी श्री.पि.डी. रामटेके हे हजर आहेत.

अर्जदाराने प्रपत्र 'अ' नुसार मागितलेली माहिती जास्त प्रमाणात आहे त्यामुळे अर्जदाराला दिनांक २२/०५/२००९ ला पत्र देवुन नेमकी कुठली माहिती पाहिजे याबाबत निरीक्षण घेण्याकरिता दिनांक २९/०५/२००९ रोजी बोलावण्यात आले. परंतु अर्जदार अर्जदार हजर झाले नाही. अर्जदाराने मागितलेली माहिती ही २००७ ते २००९ या कालावधीची आहे. ती माहिती न मिळाल्यामुळे दिनांक २५/०६/२००९ रोजी प्रपत्र 'ब' नुसार प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलात दिनांक ११/०९/२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली व सुनावणी करिता गटविकास अधिकारी यांचे तर्फे प्रतिनिधी श्री.बी.व्ही. तायडे, विस्तार अधिकारी हे उपस्थित होते तसेच अर्जदार सुध्दा उपस्थित होते. अर्जदार यांना विहीत मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे १० दिवसात माहिती पुरविण्याचे आदेश गटविकास अधिकारी, पंचायत समिती, आर्णी यांना देण्यात आले. अर्जदाराला काही माहिती पुरविण्यात आली परंतु अर्जदाराने संपुर्ण माहितीचा आग्रह धरला. वास्तविक पाहता अर्जदाराचा अर्ज माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम ७(९) नुसार नाकारता आला असता. अर्जदाराने संपुर्ण माहिती मागितली व संपुर्ण माहितीचा खर्च ५० ते ५५ हजार रुपये आहे.

तरी, अर्जदाराला निरीक्षण देवुन अर्जदाराने माहिती मागितल्यास त्याबाबत नियमानुसार पैशाचा भरणा केल्यास अर्जदाराला माहिती देण्यात यावी व तसे पत्र अर्जदाराला देण्यात यावे. गटविकास अधिकारी, आर्णी यांनी अर्जदाराला पत्र देवुन निरीक्षणाची पुन्हा संधी दयावी व त्यात त्यांना पाहीजे असलेल्या माहितीच्या खर्चाकरिता पैसे भरण्यास पत्र देवुन पत्र पाठविल्यानंतर १५ दिवसात अर्जदार हजर राहीले नाहीतर अर्जदाराला माहितीची आवश्यकता नाही, असा निष्कर्ष काढण्यात येवुन अर्जदाराचा अर्ज नस्तीबध्द करण्यात यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. १८०४ (१११) / २०१०**
**जा.क्र. दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री.वसंतराव बापुराव गावंडे,
मु.पो.काळी(दौलत), ता.महागांव,
जि.यवतमाळ.

**विरुध्द**
**१.**प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, काळी (दौलत),
ता.महागांव, जि.यवतमाळ.
**२.**जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, काळी (दौलत),
ता.महागांव, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २३/११/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कनिष्ठ अभियंता श्री.एस.बी. जाधव हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, काळी (दौलत) श्री.ए.व्हि. येरावार हे हजर आहेत.

अर्जदाराने दि. ८ ऑक्टोबर २००९ रोजी प्रपत्र 'अ' नुसार माहिती अधिकारी श्री.ए.व्हि. येरावार, ग्रामपंचायत, काळी (दौलत), ता.महागांव, जि.यवतमाळ यांचेकडे अर्ज करुन माहिती मागितली. सदरची माहिती ४ मुद्दयात मागितली. अर्जदाराला माहिती दिनांक १७/१२/२००९ रोजी देण्यात आली. अर्जदाराने प्रपत्र 'ब' नुसार दिनांक १७/११/२००९ रोजी अपिल दाखल केले त्या अपिलाची सुनावणी होवुन जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराला १० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन दयावी व कार्यालयास अहवाल विनाविलंब सादर करावा असा आदेश दिनांक ०९/१२/२००९ ला देण्यात आला. अर्जदाराला दिनांक १७/१२/२००९ रोजी व्यक्तीशः माहिती पुरविण्यात आली. अर्जदाराने दिलेल्या पोच ची प्रत रेकॉर्डवर दाखविण्यात आली. त्यानंतर सुध्दा अर्जदाराने दिनांक १५/०१/२०१० रोजी व्दितीय अपिल दाखल केले व त्यात जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे संपुर्ण उल्लंघन केले आहे असे म्हटले आहे. तरी कशाप्रकारचे उल्लंघन केले याबाबत अर्जदार गैरहजर असल्यामुळे समजु शकले नाही. अर्जदाराला माहिती दिली व अर्जदाराने जे कारण सांगितले त्याची शहानिशा होवु शकली नाही. तसेच हया आयोगासमोर दिनांक १५/१०/२०१० रोजी सुनावणी देण्यात आली व त्यावेळेला अर्जदार गैरहजर होते व शेवटची संधी म्हणुन आज रोजी प्रकरण ठेवण्यात आले होते व आज सुध्दा अर्जदार गैरहजर आहेत.

वरील बाबी लक्षात घेवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती**

**आयुक्त,**

**अमरावती खंडपीठ,**

**अमरावती**